# मुंबई विद्यापीठ

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(न) [28(2)(t)] नुसार विद्यापीठाच्या अधिसभेवर १० (दहा) नोंदणीकृत पदवीधरांची निवडणूक**

## निवडणूक वेळापत्रक (Election Schedule)

**विद्यापीठ जाहीर प्रकटन क्र.नि.वि./आयसीडी/२०२३–२४/८०० दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ च्या अनुषंगाने संभाव्य निवडणूक वेळापत्रक खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे**

निवडणूकीसाठीच्या जागा : एकूण जागा १० पैकी ५ जागा खुल्या प्रवर्गासाठी असून ५ जागा खालीलप्रमाणे राखीव प्रवर्गासाठी आरक्षित आहेत.

| अनु. क्र. | प्रवर्ग | जागा | अनु. क्र. | प्रवर्ग | जागा |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (Scheduled Caste) | ०१ | २ | अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) | ०१ |
| ३ | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती (De-notified Tribes (Vimukta Jatis) or Nomadic Tribes) | ०१ | ४ | इतर मागास वर्ग (Other Backward Classes) | ०१ |
| ५ | महिला (Woman) | ०१ | ६ | खुला प्रवर्ग (Open) | ०५ |

**४) सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.**

| अ. क्र. | तपशील | वार, दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | नोंदणी कृत पदवीधरांची मतदार नोंदणी अर्ज भरण्याची तारीख. | सोमवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२३ ते गुरूवार ३० नोव्हेंबर, २०२३ | विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. |
| २ | मतदार नोंदणी अर्ज छाननी, आक्षेप व मतदार यादी प्रसिद्धी (तात्पुरती मतदार यादी, दुरूस्त मतदार यादी आणि आक्षेप) | शुक्रवार १ डिसेंबर २०२३ ते रविवार २५ फेब्रुवारी, २०२४ | विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. |
| ३ | अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक | सोमवार, दि. २६ फेब्रुवारी, २०२४ | विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. |
| ४ | निवडणूक अधिसुचना | गुरूवार, दि. २९ फेब्रुवारी, २०२४ | विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. |
| ५ | उमेदवारी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्रमांक १(१०)(२)(ख) नूसार निवडणुकीच्या दिनांकाच्या पूर्ण १६ दिवस अगोदर) | सोमवार, दि. ११ मार्च, २०२४ (वेळ: साय. ५.०० वाजेपर्यंत) | विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Login/Registration या Option वर नामनिर्देशन अर्ज भरता येईल. **(परिशिष्ठ 'अ' प्रमाणे)** |
| ६ | उमेदवारी अर्ज छाननीचा दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्र. १(१०)(६) प्रमाणे) | बुधवार, दि. १३ मार्च, २०२४ (वेळ : सकाळी ११.०० वाजता) | फिरोजशाह मेहता सभागृह (व्यवस्थापन परिषदेचे दालन), मुंबई विद्यापीठ, कक्ष क्र. १०५, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२. |
| ७ | उमेदवारी अर्जाच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे अपील करण्याचा दिनांक | शुक्रवार, दि. १५ मार्च, २०२४ (वेळ : साय. ५.०० वाजेपर्यंत) | विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Login/Registration या Option वर अपिल करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | उमेदवारी अर्ज मागे घेण्यासंबधी लेखी कळविण्याचा दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्रमांक १(१०)(५) नुसार) | सोमवार, दि. १८ मार्च, २०२४ (वेळ : साय ५.०० वाजेपर्यंत) | रुम नं. ११०, निवडणूक विभाग, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट–४०००३२ |
| ९ | उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | बुधवार, दि. २० मार्च, २०२४ | विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. |
| १० | निवडणूक दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र.९ नुसार) | रविवार, दि. २१ एप्रिल, २०२४ (वेळ : सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | उमेदवारांची नावे जाहीर करतेवेळी मतदान केंद्रांची नावे ही विद्यापीठाच्या अधिकृत https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येतील. |
| ११ | मतपत्रिकांची छाननी व मतमोजणीचा दिनांक, वार, वेळ व स्थळ | बुधवार, दि. २४ एप्रिल, २०२४ (वेळ : सकाळी ०९.०० वाजता) | दिक्षांत सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२. |

*** टिप:– उपरोक्त नमूद केलेल्या तारखांमध्ये अवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो.**

५) **उमेदवारी नामनिर्देशन अर्जाच्या वैधतेच्यासंदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास मा.कुलगुरू यांच्याकडे अपील करण्याचा दिनांक १५ मार्च, २०२४ व वेळ सायं. ५.०० वाजेपर्यंत.**

६) **शासन आदेश क्र.संकीर्ण–२०१६/(३४७/१६)/विशि.३ दि. २८ एप्रिल, २०१७ अन्वये उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता:**

**नामनिर्देशनाच्या दिनांकापूर्वी किमान पाच वर्षे आधी पदवीधर झालेला असावा. यामध्ये अध्यापक (नियमित किंवा कंत्राटी तत्त्वावरील अध्यापकांचा–मग त्यांचा अध्यापकीय अनुभव काहीही असो), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन किंवा कलम २८(२) मध्ये अंतर्भूत असणाऱ्या इतर कोणत्याही प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या पदवीधरांचा समावेश होणार नाही.**

७) विहित नमुन्यातील नामनिर्देशन अर्ज विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या अधिकृत संकेतस्थळावरून भरता येतील.

८) योग्यरितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी सर्व कागदपत्रांसह दाखल केलेले, उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील.

९) **नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन मतदारांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते व पदनामे, कोणतीही असल्यास, आणि स्वाक्षरीकर्ता मतदारांचा व नामनिर्देशित उमेदवारांचा मतदार क्रमांक यांचा समावेश असेल, कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशित पत्रावर स्वाक्षरी करुन व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणूकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वत:च्या नामनिर्देशनामध्ये एकतर सूचक किंवा अनुमोदक असणार नाही. परंतु जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वत: सूचक व अनुमोदक असू शकेल. {एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(३)}**

१०) या निवडणूक सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(४))

११) उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकात विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी रुम नं. ११०, निवडणूक विभाग, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट – ४०००३२ येथे व्यक्तिश: किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. {एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५)} (विहित नमुन्यातील)

१२) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार नसतील तर ते सर्व उमेदवार, निवडणूकीचा निकाल जाहिर करण्याच्या दिनांकास बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर करण्यात येईल. {एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(८)}

१३) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१४) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी केलेली परिपत्रके/पत्र यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमदवारांचे नामनिर्देशन अर्ज ग्राहय धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे तसेच पात्रता शर्तीच्या ग्राहयतेसंबंधीच्या नियमांबाबतची प्रत विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील https://mu.eduapp.co.in उपलब्ध आहे.

१५) उमेदवारी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या प्रती जोडणे आवश्यक आहे. (अधिलेख खाडाखोड करु नये). छाननीच्या वेळी मूळ प्रमाणपत्र/कागदपत्र सादर करावीत. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल (मतदार नोंदणीच्या वेळी जोडलेली कागदपत्रे उमेदवारी अर्जाकरीता ग्राह्य धरली जाणार नाहीत.) **(ऑनलाईन नामनिर्देशन अर्ज भरण्याच्या मार्गदर्शक सुचना, परिशीष्ट 'अ' सोबत जोडले आहे.)**

**१. पदवी प्रमाणपत्र (Degree Certificate)**
**२. मागासवर्गीयांकरिता राखीव जागेसाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate)**
**३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(न) [28(2)(t)] मध्ये नमूद केल्यानुसार अध्यापक (नियमित किंवा कंत्राटी तत्त्वावर अध्यापकांचा — मग त्यांचा अनुभव काहीही असो), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन किंवा कलम २८(२) मध्ये अंतर्भूत असणाऱ्या इतर कोणत्याही प्रवर्गात समावेश नसल्याबाबत तसेच संलग्नित महाविद्यालये, संस्था, मान्यताप्राप्त परिसंस्थेचा पदाधिकारी/विश्वस्त नसल्याबाबतचे नामनिर्देशनपत्रासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील हमीपत्र.**
**४. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.**

१६) उमेदवारी अर्ज छाननीसाठी आणि मतमोजणीच्यावेळी उमेदवार स्वत:/सूचक/अनुमोदक किंवा प्रतिनिधी यांपैकी कोणीही एक, कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी लेखी पत्राद्वारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेली व्यक्ति म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

१७) मतदारांनी मतदार नोंदणीच्यावेळी निवडलेल्या मतदान केंद्रावरच मतदान करावयाचे आहे. मतदान केंद्र कोणत्याही परिस्थितीत बदलून देण्यात येणार नाही. परंतू एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १३ नुसार निवडणुकीच्या कामावर असणाऱ्या व्यक्तींना, ते ज्या ठिकाणी निवडणुकीच्या कामावर आहेत अशा ठिकाणी आपले मत नोंदविण्याची मुभा असेल.

१८) मतदानास येताना मतदारांनी स्वत:चा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शासकीय/निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहीत ओळखपत्र किंवा आयकर अधिकाऱ्यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहीत ओळखपत्र (PAN Card) किंवा तत्सम फोटोसहीत ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **मतदान केंद्रावरील निवडणूक अधिकाऱ्यांना हे ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतदारांना मतपत्रिका मिळणार नाही**.

१९) ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतनुसार परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधन्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे. (एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ५ व ६)

२०) मतदान केंद्रांची यादी दि. ३० मार्च, २०२४ रोजी विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

२१) एकरुप परिनियम क्र. १ मधील ९(१) नुसार नामनिर्देशन अर्ज भरतांना रु. ५००/— शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे.

क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/८०४
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२३

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी

**Note : Under Section 2(47), "registered graduate" means a graduate of a university registered or deemed to be registered by or under this Act with one of the universities;**

# <u>परिशीष्ट “अ’’</u>

## <u>ऑनलाईन नामनिर्देशन अर्ज भरण्याच्या मार्गदर्शक सुचना.</u>

१) मुंबई विद्यापीठाच्या निवडणूक Portal वर जाण्याकरीता https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळाचा वापर करावा.

२) निवडणूकीच्या Portal वर गेल्यानंतर तेथील Login/Registration या Tab ला Click करावे.

३) पदवीधर मतदार संघामध्ये अधिसभेसाठी (Senate) नामनिर्देशन अर्ज भरण्याकरीता Login for Senate या Tab वर Click करावे.

४) आपला मतदार नोंदणीकरीता अर्ज भरताना जो username व password वापरला असेल त्यांनीच Login करावे.

५) आपण Login केल्यानंतर मतदार नोंदणी अर्जामध्ये भरलेली माहिती तेथे आपोआप (automatically) येईल.

६) संबंधीत जागेवर स्वत:चा प्रवर्ग (category) व नामनिर्देशन अर्ज करण्याचा प्रवर्ग निवडावा.

७) आपला मतदार यादी (Electoral Roll) मधील अनुक्रमांक आपोआप (automatically) येईल. जर तो चुकीचा असल्यास आपण तिथे मतदार यादी (Electoral Roll) मधील अचुक अनुक्रमांक नोंदवावा. तसेच अनुक्रमांक अचुक असल्याबाबती खात्री करावी.

८) संबंधीत उमेदवारांनी ज्या मतदार संघांमध्ये (Constituency) नामनिर्देशन अर्ज भरायचा आहे त्या नामनिर्देशन अर्जाकरीता असणाऱ्या अर्हतेबाबतचे कागदपत्रे संबंधीत जागेवर एकत्र (Combine PDF) अपलोड करावीत.

९) या नंतर सुचक या मतदाराचा username (Mobile No.) तेथे टाईप करावा.

१०) त्यानंतर सुचकाचा OTP टाकावा.

११) त्यानंतर सुचकाची माहिती तेथे आपोआप (automatically) येईल.

१२) सुचकाचा मतदार यादीतील अनुक्रमांक संबंधीत जागेवर आपोआप (automatically) दिसेल. जर त्यामध्ये काही दुरूस्ती असल्यास तर ती अचुक नोंदवावी. तसेच अनुक्रमांक अचुक असल्याबाबती खात्री करावी.

१३) अनुमोदकाचा username टाईप करावा.

१४) त्यानंतर अनुमोदकाचा OTP टाकावा.

१५) अनुमोदकाची माहिती तेथे आपोआप (automatically) येईल.

१६) अनुमोदकाचा मतदार यादीतील अनुक्रमांक संबंधीत जागेवर आपोआप (automatically) दिसेल. जर त्यामध्ये काही दुरूस्ती असल्यास तर ती अचुक नोंदवावी. तसेच अनुक्रमांक अचुक असल्याबाबती खात्री करावी

१७) **तद्नंतर उमेदवारी अर्ज मुद्रण पुर्वावलोकन (Print preview) मध्ये उपलब्ध होईल. तो तपासुन घ्यावा. जर त्यामध्ये काही दुरूस्ती असल्यास Previous या Tab वर Click करून संबंधीत जागेवर जाऊन दुरूस्ती करावी. नंतर आपला अर्ज अचुक आहे. याची खात्री करावी. <u>Print preview अर्जाची Print काढून Submit करू नये ती छाननीकरीता ग्राहय धरली जाणार नाही. याची संबंधीतानी नोंद घ्यावी.</u>**

१८) **अर्ज अचुक असल्याची खात्री झाल्यानंतर Submit या Tab वर Click करावे. Submit हे Tab Click केल्यानंतर अर्जामध्ये कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

१९) तद्नंतर अर्जाचे रू. ५००/- शुल्क Online पध्दतीने भरावे. शुल्क भरल्यानंतर अर्जाची प्रींट आऊट काढावी.

२०) प्रींट काढलेल्या अर्जावर उमेदवार, सुचक व अनुमोदक यांनी दिनांक नोंदवून स्वाक्षरी करावी.

२१) स्वाक्षरी झाल्यानंतर सदर अर्ज स्कॅन करून उमेदवारांनी आपल्या (Login) लॉगिनमधून अपलोड करावा.

२२) उपरोक्त अर्जाच्या हार्ड कॉपी सोबत आवश्यक कागदपत्रे जोडावी. कागदपत्रे जोडलेला अर्ज निवडणूक विभाग, रुम नं. ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट-४०० ०३२ येथे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाच्या वेळेच्या आधी जमा करावा. कोणत्याही कारणास्तव सदर अर्ज अंतिम दिनांकाच्या वेळेच्या आधी दिलेल्या पत्त्यावर प्राप्त झाला नसल्यास तसेच Print Preview मध्ये सादर केलेला असल्यास तो नामनिर्देशन अर्ज छाननीकरीता ग्राहय धरण्यात येणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-

क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/८०४
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२३

(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी

# मुंबई विद्यापीठ

**नोंदणीकृत पदवीधर मतदार संघ**

## हमीपत्र

मी, ———————————————————————— लिहून देतो/देते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३१(३) {131(3)} मधील तरतूदीस अनुसरून मी नोंदणीकृत पदवीधर मतदार म्हणून मुंबई विद्यापीठात नावनोंदणी केली आहे. त्याचप्रमाणे कलम २८(२)(न)(t) मधील तरतुदीस अनुसरून अध्यापक (नियमित किंवा कंत्राटी तत्त्वावर अध्यापक) प्राचार्य, विभाग प्रमुख, व्यवस्थापन किंवा कलम २८(२) मधील अंर्तभुत असणाऱ्या इतर कोणत्याही प्रवर्गात माझा समावेश नाही.

वरील माहिती ही माझ्या समजुतीप्रमाणे खरी असून भविष्यात वर नमुद केलेली माहिती चुकीची आढळल्यास माझे नाव मुंबई विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदणीतून व मतदार यादीमधून वगळण्यात येईल तसेच मी अधिसभेवर निवडून आल्यास माझे अधिसभेवरील सदस्यत्व रद्द करावे. त्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही.

दिनांक :    स्वाक्षरी ............................

स्थळ :    नाव ................................

# मुंबई विद्यापीठ

**नोंदणीकृत पदवीधर मतदार संघ**

## हमीपत्र

मी, ———————————————————————————— लिहून देतो/देते की,

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३१(१)(क) {131(1)(a)} मधील तरतूदीस अनुसरून मी मुंबई विद्यापीठाचा वैद्यक/आयुर्वेद/होमिओपॅथी/ युनानी या विद्याशाखेतील ............................................ या अभ्यासक्रमाचा पदवीधर असून मी नोंदणीकृत पदवीधर मतदार म्हणून मुंबई विद्यापीठात नावनोंदणी केली आहे.

२. महाराष्ट्र शासनाने वैद्यक/आयुर्वेद/होमिओपॅथी इ. विद्याशाखांसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ नुसार नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापन केलेले असून उक्त विद्याशाखा पारंपारिक विद्यापीठांकडून काढून घेतल्या असल्याने मी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३१(१)(ख) { 131(1)(b)} नुसार नोंदणीकृत पदवीधर म्हणून नावनोंदणी केलेली नाही.

वरील माहिती ही माझ्या समजुतीप्रमाणे खरी असून भविष्यात वर नमुद केलेली माहिती चुकीची आढळल्यास माझे नाव मुंबई विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदणीतून व मतदार यादीमधून वगळण्यात येईल तसेच मी अधिसभेवर निवडून आल्यास माझे अधिसभेवरील सदस्यत्व रद्द करावे. त्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही.

दिनांक :

स्वाक्षरी ............................

स्थळ :

नाव ................................